# समाजकल्याण

## १. सीआर/३६४/वर्धा/२०१४

फिर्यादी हे गव्हा (कोल्ही), ता. समुद्रपूर जि. वर्धा येथे रहावयास आहेत. फिर्यादी यांचे मुलीवर दि. २५/१०/२०१३ रोजी बलात्कार करून तिचे अंगावर रॉकेल ओतुन जिवंत जाळल्याप्रकरणी पो. स्टेशन समुद्रपूर येथे गुन्हा दाखल होता. सदर गुन्ह्यच्या अनुषंगाने फिर्यादी हे अनुसूचित जमातीचे असल्याने त्यांना शासनाचे समाजकल्याण विभागातर्फे देण्यात येणारे आर्थिक सहाय्य प्रकरणी आरोपी लोकसेवक सुरेश डोमाजी राऊत, कनिष्ठ लिपीक, समाजकल्याण विभाग वर्धा यांनी फिर्यादीस त्यांच्या मयत मुलीची केस कमजोर आहे अशी बतावणी करून समाजकल्याण विभागातर्फे अनुसूचित जमातीकरीता मिळणाऱ्या अर्थसहाय्याचा पहिला रु.१,८७,५००/— चा चेक काढून दिल्याचा मोबदला म्हणुन तसेच अर्थसहाय्यापैकी उर्वरीत रकमेचा चेक काढून देण्यासाठी फिर्यादीकडून रु.२०,०००/— लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरबाबत पोलीस स्टेशन वर्धा शहर गु.र.क्र ३०८६/१४ कलम ७, १५ ला.प्र.का. सन १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येवून आलोसे सुरेश डोमाजी राऊत, कनिष्ठ लिपीक, समाजकल्याण विभाग वर्धा, वर्ग — ३ यांना अटक करण्यात आली आहे.